International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.1 Sept – Oct 2021

# समाज आणि धर्म

**प्रा. आर. पी. वाडते**
विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग,
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

**प्रविण रणबागले**
सहा. प्राध्यापक,
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

**प्रस्तावना:**

मानवी समाजाचा विचार करता मानवी समाजामध्ये मानवाने आपल्या स्वतःच्या विकासासाठी आणि समाज विकासासाठी अनेक सामाजिक संस्थांची निर्मिती केली ज्यामध्ये कुटुंबसंस्था, विवाहसंस्था राज्यसंस्था , शिक्षणसंस्था इत्यादी सामाजिक संस्थांचा विकास केला त्याच बरोबर त्याने धर्मसंस्था निर्माण केली. म्हणजे मानवाने मानवाचा उत्कर्ष साधण्यासाठी या सामाजिक संस्था स्थापन केल्या. व्यक्तीला या सामाजिक संस्थांच्या नियमांचे पालन केल्याने स्वतःचा विकास सुयोग्य दिशेने करता येतो. त्याच बरोबर समाजाचे स्वास्थ्य निरोगी राहत असते. भारतीय समाजाचा अभ्यास करता भारतीय समाजाचे एक प्रभेदक वैशिष्ट्ये चटकन अधोरेखित होत असते ते म्हणजे या देशात असणारी विविधता आणि एकता. विविधतेकडे पाहता सांस्कृतिक, भौगोलिक, आर्थिक, धार्मिक, प्रांतिक, भाषिक इत्यादि अशा विविध बाबतीत प्रचंड प्रमाणात विविधता आढळते. याच बरोबर या विविधतेतून हि एकता प्रस्थापित केली जाते. एकूणच समाजाचा समाजशास्त्रीयदृष्ट्या विचार करता समाजासाठी या सामाजिक संस्थांची आवश्यकता दिसून येते. अशा भारतीय समाजाचा धर्माच्या संदर्भात अभ्यास करता धर्माचा समाजावर पडलेले प्रभाव जाणवतो.

**उद्दिष्टे :**

१. धर्माचा अर्थ समजून घेणे

२. धर्माचा भारतीय समाजावरील प्रभाव समजून घेणे.

**गृहीतक** :

भारतीय समाजात अनेक धर्म असून त्यांचा प्रभाव व्यक्तीवर पडत असतो,

**संशोधन पद्धती**:

सदरचे संशोधन हे पूर्णतः दुय्यम साधनावर आधारित असून यामध्ये संदर्भग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्रे, नियतकालिक, मासिके, इंटरनेट याचा आधार घेतला आहे.

**धर्म अर्थ :**

देश कोणताही असो अथवा जिथे जिथे मानव आहे तिथे आपणाला धर्मव्यवस्था पाहावयास मिळते. आणि व्यक्ती आपल्या धर्माप्रमाणे आचरण करत असते. भूतलावरील मानवाच्या उत्पत्तीनंतर धर्माची निर्मिती झाली अथवा ती केली. जगाचा विचार करता जितके धर्म आहेत त्यातील प्रत्येक धर्माची शिकवण हि सत्याकडे चला अशी सांगणारी आहे. तरीही व्यक्ती त्याचा अर्थ आपल्या सोयीप्रमाणे लावताना दिसते. मात्र धर्माचा अर्थ समजावून घेत असताना विचारवंत, अभ्यासक यांच्यात मतभिन्नता आढळून येते. धर्माला इंग्रजी मध्ये Religion म्हणतात Religion म्हणजे ईश्वराशी जोडणे . तर धर्म या संस्कृत शब्दाचा अर्थ नियम असा आहे. कर्तव्य अशा अर्थानेही धर्माकडे पहिले जाते. समाजशास्त्रीय दृष्ट्या धर्माचा अर्थ समजावून घेत असताना एमिल दूरखाईम या फ्रेंच विचारवंताने धर्म हि पवित्र वस्तूशी संबंधित श्रद्धा व विधींची एकसंघ व्यवस्था असल्याचे सांगितले आहे. भारतीय समाजाचा विचार करता हिंदू धर्मात जो समाजची धारणा करतो तो धर्म होय

असे सांगितले आहे. महामानव गौतम बुद्ध यांनी धर्म या शब्दाऐवजी धम्म हि संज्ञा वापरली. धम्म म्हणजे नीतितत्त्वे असा त्यांना अर्थ अभिप्रेत होता.

**धार्मिक भिन्नता :**

भारतीय समाजाचा विचार करता भारतीय समाजात अनेक धर्म असल्याचे दिसते ज्यामध्ये हिंदू धर्म, बौद्ध , शीख, जैन, हे भारतात उदय पावलेले धर्म तर भारताच्या बाहेरून भारतात आलेले जसे इस्लाम, ख्रिश्चन ज्यू इत्यादी धर्म असल्याचे दिसते. त्यातूनच प्रत्येक धर्मात प्रथा, परंपरा, चालीरीती, आचारविचार पद्धती, धर्मग्रंथ यामध्ये भिन्न भिन्न असल्याचे दिसते. काही धर्म ईशवराला मानतात तर काही धर्मात ईश्वराचे अस्तित्व मान्य केले नाही. काही लोक नास्तिक तर काही आस्तिक धर्मीय असल्याचे दिसतात.

**धार्मिक दंगली :**

आज आधुनिक समाजात धर्माचा अर्थ व्यक्ती स्वतःच्या सोयीप्रमाणे आणि आपल्या बुद्धीच्या आधाराने लावण्याचा प्रयत्न करताना दिसते. समाजात संघर्ष होण्यापाठीमागे अनेक कारणे आहेत. प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक, राजकीय,सांस्कृतिक,धार्मिक इत्यादी घटकाचा विचार केला जातो. परंतु धार्मिक दृष्ट्या संघर्षाकडे पाहता धर्म व्यक्तीला संघर्षांपासून दूर ठेवण्याची शिकवण देत असला तरी समाजात अनेकवेळा धार्मिक संघर्ष होताना दिसत आहेत. चिथावणीखोर भाषण , दुसऱ्या धर्माप्रती असूया बाळगून केली गेलेली विधाने, राजकीय स्वार्थापोटी दोन धर्मामध्ये निर्माण केली जाणारी तेढ, महापुरुषाच्या विटंबना ,देवी देवतांची विटंबना , या सारख्या विविध कारणामुळे समाजात धार्मिक संघर्ष होऊन वित्तीय व मनुष्य हानी होते.

**धर्म व स्त्रिया :**

भारतीय समाजात स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्त्रियांना दुय्यम स्थान अथवा दर्जा दिला जात होता.आजही त्यांच्या दर्जा मध्ये परिवर्तन झाले असले तरी अद्याप दुय्यम दर्जा समाप्त झाला असे म्हणता येत नाही. वास्तवता भारतीय समाजात स्त्रीला देवीचा दर्जा बहाल केला जात असला तरी समाजात श्रद्धा आणि अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात आढळतात. यातून धार्मिक दृष्टिकोनातून स्त्रियांना मासिक धर्म या कालावधीत त्यांच्यावर काही समाजात व कुटुंबात निर्बंध लादले जातात. इतकेच काय तर महिलांना देवीदेवतांच्या मंदिरात प्रवेश दिला जात नाही. स्त्री हक्क चळवळ स्त्रियांना मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून स्त्रियांना आजही संघर्ष करावा लागतो आहे.

**संदर्भ:**

1. साधना साप्ताहिक २६ जून १९९९
2. साधना साप्ताहिक १९ सप्टेंबर २००९
3. लोकसत्ता १६ डिसेंबर २०१८
4. प्रा. चंद्रकांत रघुनाथ खंडागळे, धर्माचे समाजशास्त्र
5. https://pclive7.com/?p=39119https://maharashtratimes.com/editorial/column/religion-righteousness-and-woman/articleshow/69050295.cms
6. https://thefocusindia.com/national/the-incidence-of-religious-and-ethnic-riots-in-the-country-doubled-in-2020-with-the-figures-rising-due-to-the-delhi-riots-84247/
7. धर्म – मराठी विश्वकोश प्रथमावृत्ती (marathi.gov.in)